महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६४ वा | दिनांक : १७/०८/२०२५ | वार : रविवार

# लाडकी बहीण योजना अखंड सुरू राहणार - ना. अदिती तटकरे






**अलिबाग :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या फेरपडताळणीवरून राज्यात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. पण राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी ही फेरपडताळणी सुरू असली तरी पात्र लाभार्थी महिलांवर कोणताही अन्याय होणार नसल्याची ग्वाही दिली आहे.

मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सरकारला मिळालेला डेटा हा प्राथमिक स्वरुपाचा आहे. या योजनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यावेळी या योजनेंतर्गत २ कोटी ६३ लाख लाख महिलांची नोंदणी झाली होती. प्राथमिक पडताळणीत १० ते १५ लाख अर्जदार अपात्र ठरले होते. त्यानंतर आम्ही वेगवेगळ्या विभागांकडून त्यांच्याकडील लाभार्थ्यांची माहिती मागवली. माहिती तंत्रज्ञान विभागाने आम्हाला सर्व विभागाच्या २६ लाख लाभार्थींची माहिती दिली. त्यात काही लाभार्थी महिलांना अन्य योजनांचा लाभ मिळत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार काही महिला पहिल्याच पडताळणीत बाद ठरल्या.

पत्रकारांनी यावेळी अंगणवाडी सेविकांनी गावातील संबंध बिघडण्याच्या भीतीने पडताळणीचे काम करण्यास असमर्थता दर्शवल्याविषयी प्रश्न केला. त्यावर अदिती तटकरे म्हणाल्या, सरकार प्रस्तुत महिला गरजू महिलांसाठी राबवत आहे. शासकीय सेवेत असतानाही या योजनेचा लाभ घेतला जात असेल तर शासन त्याविषयी योग्य तो निर्णय घेईल. या प्रकरणी कुणालाही चुकीचा लाभ मिळू नये यासाठी सरकार योग्य ती पाऊले उचलत आहे. त्यामुळे सर्वांनी अंगणवाडी सेविकांना पडताळणीसाठी सहकार्य करावे.

सरकार जनतेला वेगवेगळ्या शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी कटिबद्ध आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ एखादी महिला घेत असेल तर तिला अपात्र ठरवले असेल, तर कदाचित त्या महिला दुसऱ्या एखाद्या योजनेचा लाभ मिळत असेल किंवा अधिकच्या उत्पन्नामुळे ती निकषात बसत नसेल. पण चुकीच्या पद्धतीने कुणालाही या योजनेचा लाभ मिळता कामा नये, असे अदिती तटकरे यांनी या प्रकरणी स्पष्ट केले.

उल्लेखनीय बाब म्हणजे महायुती सरकारने गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली. याय योजनेंतर्गत पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. या पैशांमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषण सुधारण्यास मदत होते. ही योजना जुलै २०२४ पासून लागू झाली असून, पिवळे/केशरी रेशन कार्डधारक महिलांना उत्पन्नाच्या दाखल्याची गरज नाही. अर्ज ऑनलाइन किंवा ऑफलाइन अंगणवाडी/ग्रामपंचायत मार्फत करता येतो. या योजनेमुळे महिला सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली आहे.

# ऑपरेशन सिंदूर केवळ लष्करी कारवाई नव्हती - ब्रिगेडियर सुनील कुमार यांचे प्रतिपादन



**अहिल्यानगर :** कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणारा प्रत्येक नागरिक देशभक्त असतो. ऑपरेशन सिंदूर केवळ एक लष्करी कारवाई नव्हती, तर राष्ट्रीय एकतेचे आव्हान होते, असे प्रतिपादन ब्रिगेडियर पी. सुनील कुमार (सेना पदक आणि बार) यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालय, 17 महाराष्ट्र तुकडी एनसीसी युनिट आणि यंत्रीकृत पायदळ केंद्र व शाळा (एमआयसी अँड एस), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच 'ऑपरेशन सिंदूर' या लष्करी मोहिमेवर प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर' हे धैर्य, अचूकता आणि त्यागाचे प्रतीक असलेले महत्त्वपूर्ण लष्करी अभियान मानले जाते. या कार्यक्रमात एनसीसी कॅडेट्स, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या विशेष सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून यंत्रीकृत पायदळ केंद्र व शाळा (एमआयसी अँड एस) चे कमांडंट, ब्रिगेडियर पी. सुनील कुमार (सेना पदक आणि बार) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्नल सतीश शिंदे, संचालक, विद्यापीठ कक्ष आणि संगणकीकृत माहिती प्रक्रिया (एडीपी) अधिकारी, एमआयसी अँड एस यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. नोल परगे यांनी सत्कार केला. ब्रिगेडियर पी. सुनील कुमार म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या शाखेत प्रवेश मिळवण्यासाठी सतत अभ्यास आणि प्रामाणिक परिश्रम घ्यावे. आज माहितीच्या युगात माहितीचे युद्ध सुरू आहे. प्रत्येक नागरिक योग्य माहितीचा प्रसार करतो, तेव्हाच समाज बळकट होतो. अशा कार्यक्रमांमुळे देशभक्तीची भावना वृद्धिंगत होते

या प्रसंगी प्राचार्य डॉ. नोल परगे, निबंधक भिंगारदिवे, उपप्राचार्य डॉ. पी. सी. बेदरकर, डॉ. विजयकुमार भालसिंग तसेच अनुदानित नसलेल्या विभागाचे समन्वयक डॉ. रझाक सय्यद उपस्थित होते. प्राध्यापक, एनसीसी कॅडेट्स, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने व्याख्यानाला उपस्थित राहिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लेफ्टनंट डॉ. एम. एस. जाधव, सहयोगी एनसीसी अधिकारी यांनी विशेष प्रयत्न केले. कॅडेट निशा मुजुमदार यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. महादेव एस. जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. या व्याख्यानामुळे उपस्थित सर्वांमध्ये देशभक्तीची भावना प्रबळ झाली आणि भारतीय लष्कराच्या शौर्याबद्दल अधिक अभिमान निर्माण झाला.

लष्कराचे शौर्य अन्‍ वचनबद्धतेबद्दल आदर कर्नल सतीश शिंदे यांनी 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेचा सविस्तर व प्रत्यक्ष अनुभव उपस्थितांसमोर मांडला. मोहिमेतील धोरणात्मक गुंतागुंत, जमिनीवरील वास्तव परिस्थिती आणि सैनिकांनी संकटाच्या वेळी दाखवलेले अदम्य धैर्य यांचे त्यांनी प्रभावी वर्णन केले. त्यांच्या सादरीकरणामुळे भारतीय लष्कराच्या शौर्याबद्दल व वचनबद्धतेबद्दल उपस्थितांच्या मनात अधिक आदर निर्माण झाला. मोहिमेत सहभागी झालेल्या जवानांच्या प्रेरणादायी अनुभवांनी व्याख्यानाला विशेष उंची मिळाली.

# नरेंद्र मोदी यांनी १२ वर्षे पंतप्रधान कार्यालयात गोट्या खेळल्या का? संजय राऊत यांचा खोचक प्रश्न



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून बाराव्या वेळेस भाषण केले आहे. मात्र आता सरकारचे तेरावे येणार आहे. आता तेराव्या वेळेस पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी तेथे भाषण करू शकणार नाही. जनतेला मोठी भेट देणार असल्याचे मोदी म्हणाले. मात्र, हे लोक सत्तेत राहणार नाही, हीच मोठी भेट असेल, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.

मागील १२ वर्षात नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान कार्यालयात गोट्या खेळल्या का? आजही तुम्ही पण पंडित नेहरू, महात्मा गांधी सरदार पटेल यांना दोष देत आहात? मात्र गेल्या बारा वर्षात तुम्ही काय केले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ऑपरेशन सिंदूर देखील अर्धवट केले आहे. भौगोलिक परिस्थिती बदलण्याची तुम्हाला संधी आली होती. अखंड हिंदुस्तानाचे सावरकरांचे स्वप्न पूर्ण करायची संधी आली होती. मात्र तुम्ही ते केले नाही. हा लाल किल्ल्याचा गैरवापर होत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ ऑगस्ट २०२५

# विविध उपक्रमाने श्रीकृष्ण महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा





**उमरगा (नागसेन कांबळे) :** तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी येथे १३,१४,आणि १५ असे स्वातंत्र्याचा महोत्सव विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. "हर घर तिरंगा" या अभियानांतर्गत पहिल्या दिवशी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसरात प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसमवेत प्रत्येकी तीन असे विपुल प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले.दुसऱ्या दिवशी ध्वजारोहण झाल्यानंतर महाविद्यालय आणि परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.त्यात विद्यार्थी, प्राध्यापक आणि गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा.प्रभाकर तात्या हिरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले नंतर सर्वांच्या उपस्थितीत राष्ट्रगीताची सलामी देण्यात आली.प्रारंभी प्रास्ताविकपर संभाषणात प्राचार्य डॉ.जी.एम राठोड यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य सांगून स्वातंत्र्यासाठी हुतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांची आठवण करून देताना स्वातंत्र्यात स्वतंत्रपणे जगता येईल याचे भान आणि जबाबदारी सर्वांनी घेतली पाहिजे.जे मिळाले आहे ते जोपासणे व त्याचे संवर्धन करणे हे एक निकोप समाज वृद्धीसाठी आवश्यक आहे.स्वातंत्र्याचा आनंद तर आहेच पण त्याचबरोबर उन्माद आणि उन्मत्तपणा यावर सगळ्यांनीच नियंत्रण ठेवले पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर. एन. निगडे यांनी केले.तर कार्यक्रमासाठी निर्मोही व्यक्तिमत्व म्हणून प्रसिद्ध असलेले आणि प्रकृती अस्वास्थ्य असतानाही संस्थेचे सचिव दामोदर काका पतंगे आवर्जून उपस्थित होते.यावेळी स्वातंत्र्यदिनाची समयसूचकता राखून कोणत्याही प्रकारचे व्यसन न करण्याची शपथ सर्व उपस्थितासमवेत घेण्यात आली. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित लोक, माजी स्वातंत्रसैनिक, संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे सर्व नवनियुक्त प्रतिनिधी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचा उत्साहपूर्ण सोहळा



**छत्रपती संभाजीनगर :** एन-11 हडको येथील वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालय आणि प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री. निलेश पाटील सर(अध्यक्ष प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ) उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री. शैलेंद्र पाटील सर (मुख्याध्यापक, वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालय), मा.श्री. ढमाले सर (मुख्याध्यापक, प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा), आणि मा.श्री. दिनेश पाटील सर (सदस्य प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ) यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.यावेळी संस्थेचे सदस्य मा.श्री.दिनेश पाटील सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते गायली आणि स्वातंत्र्याचा अर्थ, देशाचे महत्त्व यावर प्रेरणादायी भाषणे दिली.अध्यक्षीय भाषणात मा.श्री. निलेश पाटील सरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि देशाच्या विकासात युवकांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे सांगितले. मा.श्री. शैलेंद्र पाटील सर आणि मा.श्री. ढमाले सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. वले सरांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. जोगे सरांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सामान्य ज्ञान स्पर्धा संपन्न



**पिंपळनेर :** विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उच्चपदस्थ नोकरी मिळवून यश संपादन करायला हवे. त्यासाठी विविध परीक्षाच्या माध्यमातून आपले ज्ञान वाढवायला हवे. महाविद्यालयातील विविध कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थी सर्वगुण संपन्न व्हायला हवा. असे प्रतिपादन व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रा. डॉ. लहु पवार यांनी केले. यावेळी विचार मंचावर पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे सचिव ए.एस.बिरारीस, प्रा. डॉ. धनंजय पाटील (नंदुरबार) करीअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सतीश मस्के व सहसमन्वयक प्रा. सी. एन.घरटे आदी उपस्थित होते. कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने करिअर कट्टा च्या वतीने सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करताना पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे सचिव ए.एस. बिरारीस म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपला स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करायला हवा. जो विद्यार्थी जीवनात यशस्वी होतो त्याला नेहमी वरचे स्थान प्राप्त होत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कष्ट, मेहनत घेऊन आपले स्वतःचे जीवन घडवायला हवे. करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ.सतीश मस्के म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नेहमी अशा परीक्षेत भाग घेऊन जीवनाची दिशा ठरवायला हवी. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप परिश्रम करून नानाविध कौशल्य मिळवायला हवीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभाराचे कार्य सहसमन्वयक प्रा.सी.एन.घरटे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. एस. एन.तोरवणे, प्रा. डॉ. वाय.एम. नांद्रे आदी उपस्थित होते.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी सौरभ बेनुस्कर श्रीमती ठाकूर बाई आदिनी परिश्रम घेतले.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ ऑगस्ट २०२५

## नाशिक रोड कॅम्प केंद्रीय विद्यालयात स्वातंत्र्य दिन मोठ्या जल्लोषात साजरा



**नाशिक (प्रतिनिधी):** शहराच्या तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नासिक रोड कॅम्पमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साह आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. याप्रसंगी तोफखाना केंद्राच्या मनुष्यबळ विकास केंद्राचे शिक्षण अधिकारी लेफ्टनंट कर्नल विक्रांत काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. प्राचार्य गजराज मीना यांनी शाळेतच विकसित केलेले हिरवे रोप देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. स्वागत भाषणात प्राचार्य गजराज मीना यांनी स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यानिमित्त शाळेचा सहभाग आणि विविध उपक्रमांवर चर्चा करताना पाहुण्यांना संबोधित केले. रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी "भारत भारत हम इसकी संतान" हे दमदार देशभक्तीपर गीत सादर केले. प्राथमिक विभागातील छोट्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या नृत्यातून ऑपरेशन सिंदूरची झलक सादर केली आणि प्रेक्षकांकडून प्रचंड टाळ्या मिळवल्या. त्यानंतर, माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले. काव्या, कनक, गरिमा, जान्हवी गाडेकर आणि अदिती कुमारी यांनी हिंदी आणि इंग्रजीमध्ये भाषणे दिली. केशव माधवन आणि तरुण माधवन यांनी एक मधूर देशभक्तीपर गीत सादर केले. कार्यक्रमात शाळेतील खेळाडू विद्यार्थ्यांना लेफ्टनंट कर्नल विक्रांत काळे यांनी स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडियामध्ये केलेल्या कामगिरीबद्दल सन्मानित केले. शैक्षणिक क्षेत्रातील शाळेच्या योगदानाबद्दल प्रमुख पाहुणे विक्रांत काळे यांनी कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना नवीन तांत्रिक ज्ञान घेऊन देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले. वरीष्ठ शिक्षिका उज्ज्वला चांदोरकर यांनी आभार मानले. धरित्री निर्भवणे, तुषार वारडे यांनी सूत्रसंचलन केले. अविनाश पवार, अमित कुमार शुक्ला, आरीफ बेग, रोहित गौड, सुदर्शन गुप्ता, पूजा यादव, शैलेंद्र कुमार यादव, आकांक्षा, अरविंद लोखंडे, सतीश बडगुजर, महादेव इघारे, सागर काठोळे, स्वाती सोनुले, आविष्कार ढिवरे आदींसह सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान दिले.

## बारवाले महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा




**जालना :** येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालय व्यवस्थापकीय मंडळाचे संचालक श्री. अरूण अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक उपक्रम सादर केले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना यावेळी मानांकन प्रदान करण्यात आले. संगीत विभागाच्या वतीने राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गायन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी यावेळी विविध रचनात्मक कलाकृती सादर केल्या. तंबाखू आणि इतर नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन विरोधी सर्वांनी शपथ घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागातर्फे याचे आयोजन केले होते. याप्रसंगी प्राचार्य कविता प्राशर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणाचे सूत्रसंचालन डॉ.बी.बी. सले आणि एनसीसी ऑफिसर निधि तिवारी, कुणाल देशपांडे यांनी केले.

## कालिकादेवी विद्यालयात,"भारतीय स्वातंत्र्य दिन" उत्साहात साजरा



**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी, आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, "७९ वा स्वातंत्र्य दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सिध्देश्वर संस्थानचे मठाधिपती,ह.भ.प स्वामी विवेकानंद शास्त्री महाराज यांच्या हस्ते व प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर सामुहीक राष्ट्रगीत व महाराष्ट्रगीत घेण्यात आले.याप्रसंगी वरूणराजाचे ही आगमन झाले होते.स्वामी विवेकानंद शास्त्री महाराज यांनी 'आपल्या भाषणातून सांगितले,की आपण सर्वजण स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांच्या काळात पारतंत्र्यात होतो.सन्मानाने जीवन जगता येत नव्हते,आज मात्र सर्व भारतीय स्वाभिमानाने व ताठ मानेने जीवन जगत आहेत. म्हणून स्वातंत्र्यासाठी ज्या सैनिकांनी आपले बलिदान दिले त्यांचे स्मरण आपण करायला हवे.असा उपदेश केला.त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, 'अनेक भारतीय क्रांतिकारकांच्या चिरंतन कार्यामुळेच हा सोन्याचा दिवस आपल्याला बघायला मिळाला आहे.तसेच '१५ऑगस्ट' हा दिवस आपल्या मानव मुक्तीचा दिवस आहे.तो आपण राष्ट्रीय सण-उत्सव म्हणून साजरा करतो.तेव्हा हा राष्ट्रीय उत्सव साजरा करण्यासाठी,विद्यालयात ह.भ.प.स्वामीजीं व आपण सर्वजण पडत्या पावसात आलात,त्यामुळे आमचा आनंद द्विगुणीत झाला.त्यासाठी स्वामीजीसह सर्वच मान्यवर,अतिथी,प्रमुख कार्यकर्ते व उपस्थितांना प्राचार्य भांगे साहेबांनी स्वातंत्र्यदिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी शिरूर नगरीचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष मा.रोहीदास पाटील गाडेकर, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक मा.दत्ता पाटील गाडेकर,जेष्ठ नगरसेवक अर्जूनदादा गाडेकर पाटील, नगरसेवक तथा माजी प्राचार्य वसंतराव काटे,मा.गोविंदराव पाटील गाडेकर,नगरसेवक तथा पाणी पुरवठा सभापती मा.अक्षय रणखांब,नगरसेवक तथा बांधकाम सभापती मा.अरूण भालेराव,नगरसेवक मा.भिमराव गायकवाड,नगरसेवक दादासाहेब हारीदास,नगरसेवक गणेश तळेकर, मा.बापु गाडेकर,प्राचार्य डाॅ.विश्वास कंधारे,माजी प्राचार्य सुधाकर खोले,मा.अंदुरे गुरूजी,पत्रकार मा.गोकुळजी पवार,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे तसेच सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी भर पावसात मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ ऑगस्ट २०२५


## संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी 750 जयंती वर्ष निमित्त डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक कनिष्ठ महाविद्यालयात सामुहिक पसायदान व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई या होत्या तर प्रमुख वक्त्या म्हणून वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रेमला मुखेडकर या होत्या. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांची प्रमुख उपस्थिती होती. पसायदानाचे महत्व सांगताना डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्य जनतेला समजेल अशा भाषेत गीता ज्ञान मराठीत ज्ञानेश्वरीच्या स्वरूपात आणले. आज विज्ञानामुळे मानवाने कितीही प्रगती केली तरी लोक खऱ्या ज्ञानापासून दूर जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनात आनंद हरवला आहे तो प्राप्त करण्यासाठी आत्मज्ञान प्राप्त करण्याची गरज आहे. पसायदान ही फक्त धार्मिक प्रार्थना नाही तर ती सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून जगण्याची मागणी आहे. प्रत्येकाचे वर्तन नितीनुसार योग्य आचरण करणारे असावे. ते वर्तन सत्य, प्रामाणिकपणा न्याय ,जबाबदारी आणि चांगुलपणावर आधारित असावे.संत ज्ञानेश्वर विश्वात्मक देवाकडे वाणी द्वारे प्रसन्न होऊन प्रसाद रूप आशीर्वाद सर्व मानव प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी पसायदान मागतात. दृष्टांचे दुष्टपण नाहीसे होऊन त्यांच्यामध्ये सत्कर्म वाढीला लागावे. सर्व जीवांमध्ये मैत्री भाव निर्माण व्हावा, दु:ख आणि अज्ञानाचा अंधार नाहीसा व्हावा, विश्वात ज्याला जे हवे ते मिळावे. सर्व प्रकारच्या मांगल्याचा वर्षाव करणारे संत पुरुष जन्माला यावे आणि अशा सत्पुरुषांचा सहवास प्रत्येकाला भेटावा, त्यांच्या सहवासातून सर्वांमध्ये चेतना निर्माण व्हावी, कारण हे सगळे संत कल्पतरू आहेत. रत्नांची खाण आहेत, अमृताचे समुद्रच आहेत, म्हणून अशा सत्पुरुषांच्या सहवास सर्वांना मिळावा. चंद्राची निर्मळ शीतलता सूर्याचा प्रकाश ज्याप्रमाणे लाभतो त्याप्रमाणे सर्व सज्जन संत आहेत. विश्वातील सर्व लोक सुखी व्हावेत. या ग्रंथाचे ज्ञान घेऊन, सर्व विकारावर मात करून आत्मिक उन्नती करावी असे पसायदान विश्वेश्वराकडे ज्ञानेश्वर मागतात तेव्हा ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तीनाथ हा प्रसाद तुला नक्की लाभेल असा आर्शिवाद देतात तेव्हा ज्ञानदेव आनंदी होतात. अशा प्रकारे पसायदानामधून वैश्विक बंधूभाव, प्रेम, आनंद ज्ञानेश्वरांनी मागितलेला आहे. असे प्रतिपादन डॉ. प्रेमला मुखेडकर यां◌ंनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पसायदानातील विचारांचा आपल्या जीवनात प्रत्यक्ष उपयोग करावा. विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले. ज्ञानेश्वरी सर्वांनी वाचली पाहिजे, समजून घेतली पाहिजे. त्यानुसार आचरण केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. सुनिता बाजपाई यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले तर शिला जीरे यांनी आभार मानले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी - विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

## बेरडवाडी प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिनाचा उत्सव उत्साहात साजरा




**मुरूम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : बेरडवाडी प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतराव मंडले होते. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रणजीतकुमार भोकले, उपसरपंच दशरथ मंडले, तसेच शिवशंकर मंडले, काशिनाथ वासुदेव, कनय्या भोकले, पूजा मंडले, ज्योती भोसले, अनिता मंडले, सदस्य भाग्यश्री वासुदेव, सपना मंडले, हणमंत भोकले, खंडेराव मंडले ,चंद्राम मंडले, राम मंडले, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वजवंदनाने झाली. शाळेच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित असताना विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतं, भाषणं व सांस्कृतिक कार्यक्रम सादर कर...

## विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर** : विश्वकर्मा प्राथमिक, माध्यमिक इंग्लिश माध्यम शाळेत स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आला. तीन दिवसीय कार्यक्रमात १३ ऑगस्टला रमेश जोशी, १४ ऑगस्टला, मुख्तार शेख, १५ ऑगस्टला पंडित शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये क्रांतिकारक वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सादर केली. या कार्यक्रमाला अकिल पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व व स्वातंत्र्य मिळण्यासाठी स्वातंत्र्यसेनानीचे योगदानाविषयी मार्गदर्शक भाषणे दिली. कार्यक्रम प्रास्ताविक प्रदिप भाले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अदिती अरक,मयुरी काळे यांनी केले.संजय पगारे, शितल मुरकुटे,नाजेरा शेख,अजमेरी शेख , नृसरत सय्यद यांची उपस्थिती होती.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ ऑगस्ट २०२५

## जि. प. प्राथमिक शाळा रेल येथे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** जि प प्राथमीक शाळा रेल येथे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते ध्वजावरण करण्यात आले यावेळी रेल कणकवती नगर रेल तांडा येथील सरपंच रंजना धनसिंग राठोड व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष परवेज बागवान व ग्रामपंचायत सदस्य संदीप थेटे धनसिंग राठोड ललित गायकवाड प्रदीप थेटे रमेश बोडखे ग्रामसेवक पाडाळे मॅडम व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सुशिला दिवेकर सदस्य अकीला बागवान बाळू अण्णा थेटे भाग्यश्री थेटे विजय सातदिवे यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषण करण्यात आले सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक विक्रम गदळे व आभार प्रदर्शन वैशाली बोरसे आदींनी केले

## मुरूमच्या प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थ्याची एम. बी. बी. एस. साठी निवड




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, मुरूम चा माजी विद्यार्थी शेख अब्दुलरहेमान सईदअहमद या विदयार्थ्याची ई.एस.आय.सी. मेडिकल कॉलेज, कलबुर्गी येथे प्रतिष्ठित एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.शालेय जीवनापासूनच अभ्यासात प्राविण्य मिळवणारे शेख अब्दुलरहेमान यांनी चिकाटी, कष्ट आणि मार्गदर्शनाच्या जोरावर ही यशाची शिखरे गाठली. त्यांच्या या यशामुळे शाळा, मुरूम शहर आणि कुटुंबियांचा अभिमान द्विगुणित झाला आहे.या यशाबद्दल नगर शिक्षण विकास मंडळाचे विश्वस्त बसवराज पाटील ,अध्यक्ष बापूराव पाटील ,शरण पाटील, सचिव व्यंकटराव जाधव यांनी अभिनंदन केले . संस्थेच्या वतीने या यशस्वी विद्यार्थ्याचा गौरव अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आले होते .यावेळी माजी मुख्याध्यापक सच्चिदानंद अंबर ,शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा जोशी यांच्या शुभहस्ते शेख अब्दुलरहेमान सईदअहमद याचे सत्कार केले.प्रा.डॉ.पुरुषोत्तम बारवकर धनराज हळळे ,संगमेश्वर लामजने यांनी अभिनंदन केले .यावेळी पर्यवेक्षक विरेंद्र लोखंडे , सुभाष धुमाळ ,पंकज पाताळे सागर मंडले ,जगदीश सुरवसे ,सर्व शिक्षक,शिक्षिका ,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले . “भविष्यात ते एक यशस्वी डॉक्टर होऊन समाजसेवेची नवी उंची गाठतील,” असा विश्वास सर्व शिक्षकांनी आपल्या अभिनंदनपर मनोगतातून व्यक्त केले .या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन शिक्षक जगदीश सुरवसे यांनी केले .

## बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कन्नड (कृष्णा शिंदे) :** बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकी येथे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला . . .आज दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी शाळेचे प्रांगण रंगबिरंगी पताका आणि आकर्षक रांगोळी काढून सजवण्यात आले होते गावात प्रभावात फेरी काढण्यात आली,शाळेचे मुख्याध्यापक श्री.मुक्तानंद गोस्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध सामूहिक कवायत केली.यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य, भाषणे यात उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.या सर्व कार्यक्रमाला गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे साथ दिली, आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात बक्षीस देण्यात आली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक श्री एन. एच.निंभोरे,श्री.जी.एल. दारवंटे, लिपिक श्री.कल्याण पवार,सेवक श्री . रवींद्र थोरात,संजय वारे,बळीराम राठोड, सचिन जाधव यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले .




## मीटमिटा शालेय विद्यार्थ्यांना मिळाली हक्काची शाळा




**दौलताबाद (जावेद अहमद) :** १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते मीटमिटा येथे भव्य शालेय इमारती चे भूमिपूजन करण्यात आलेमिटमिटा येथे महानगरपालिका ची दहावी पर्यंत ची शाळा असून या शाळेत जवळपास ७०० विद्यार्थी दहावी पर्यंत शिक्षण घेतात तीस वर्षे जुनी शाळा मुख्य रस्त्यावर होती त्यात ती शाळा अतिक्रमणामुळे तुटणार होती येथील विद्यार्थ्यांनी मनपा आयुक्त जी श्रीकांत यांची भेट घेऊन सांगितले होते की आमची शाळा तुटणार आहे आम्हाला भविष्यात आयुक्त, डॉक्टर, पोलीस अधिकारी, वकील असे व्हयाचे आहे आता आम्ही कुठे शिकणार व उच्च पदस्थ व्यक्ती कसे होणार ही गंभीर बाब लक्षात घेत आयुक्तांनी जागा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले त्यांनी जुगलकिशोर तापडिया यांच्या कडे बोलणी करून एक एकर जागा होती ती त्यांनी मोफत उपलब्ध करून व बांधून देण्याची तयारी दर्शविली व बाजूला असलेली एक एकर जमीन शिसोदे कुटुंबाची होती त्यांनी सुद्धा ती जागा शाळेसाठी मोफत देऊन टाकलेशाळाची भव्य इमारत उभी राहणार आहे त्यात दहा खोली खाली व दहा खोली वर असणार आहे समोर खेळायला मैदान उपलब्ध होईलयावेळी जी श्रीकांत यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले लहान मुलांच्या प्रश्नामुळे आज हे सर्व काही झाले आहे याचे अभिमान वाटतोअसे त्यांनी सांगितलेयावेळी मनपा उपायुक्त अंकुश पांढरे,सहआयुक्त रणजित पाटील, माजी महापौर नंदकुमार घोडले,उपजिल्हा प्रमुख अंबादास म्हस्के,जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ऍड अशोक मुळे,माजी नगरसेवक सुभाष शेजवळ,जुगलकिशोर तापडिया, पद्मजी तापडिया,मराठा शिक्षण संस्था चे किशोर शिसोदे,तुषार शिसोदे, अक्षय शिसोदे,मुख्याध्यापक ननावरे,नुमान खान,शालेय समिती अध्यक्ष लक्ष्मण बनकर,हर्षदा शिरसाठ शाखा प्रमुख राहुल यलदी ,प्राध्यापक शिवाजी गायकवाड, वेदांत रत्नपारखे,किसन कनिसे, राहुल वाणी,राजेश जाधव ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १७ ऑगस्ट २०२५


## राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा



**बिल्डा** : मेहेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर येथे 79 वा भारतीय स्वातंत्र्यदिन आज महाविद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला ठिक सकाळी 7:45 वाजता कॉलेज च्या इमारतीत ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आला मा. श्री. एकनाथ दामोदर मुळे (पोलीस पाटील बिल्डा) यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले... यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. सुदामभाऊ मते (माजी तालुकाध्यक्ष कॉंगेस कमिटी व पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी सरपंच बिल्डा) तसेच गावातील जेष्ठ नागरिक श्री. सुरेशराव मुळे, श्री. विलासराव देवकर, श्री. सुंदरराव देवकर, श्री. संदीप देवकर तसेच महाविद्यालयचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## किल्ला पर्यटकांनी फुलला




**दौलताबाद (जावेद अहमद)** :शनिवार 12 हजार पर्यटकांची हजेरीदरवर्षी किल्ला पाहण्यासाठी देश विदेशातील शेकडो पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येत असतात सतत शुक्रवारी शनिवार रविवारी सुट्टीत पर्यटकांच्या गर्दीने किल्ला बहरले आहे श्रावण महिन्यात घुरुष्णेश्वर मंदिर वेरूळ,भद्रा मारुती मंदिर खुलताबाद येथे भाविक व पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते त्याच बरोबर दौलताबाद किल्ल्यावर सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतातपर्यटकांच्या गर्दी ने बहरल्याने व्यवसायीकाना सुगीचे दिवस दिसत आहे।हॉटेल चालक, फळ विक्रेते, फोटोग्राफर ,गाइड, पुस्तक विक्रेते,कटलेरी विक्रेते, आईसगोळा विक्रेते यांचे व्यवसाय बरे दिसत आहेवाहन पार्किंग सुद्धा फुल्ल झाल्याचे दीसून आले. दौलताबाद किल्ला, खुलताबाद, सुलीभजन, वेरूळ लेणी, घुरुष्णेश्वर मंदिर, म्हैसमाळ आदी ठिकाणे एकाच रस्त्यावर असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी येत असतातपर्यटकांच्या गर्दी मुळे रस्त्यावर वाहनांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने मुंगी सारखे वाहने चालत होते

## माजी सैनिक संदीप शेळके यांच्या उपस्थितीत तिरंगा रैली काढण्यात आली



**दौलताबाद (जावेद अहमद)** : १५ ऑगस्ट रोजी ७९ स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने अब्दीमंडी येथे तिरंगा रैली माजी सैनिक संदीप शेळके यांच्या उपस्थितीत काढण्यात आली या रॅली मध्ये जिल्हा परिषदेच्या विद्यार्थी सहभागी झाले होतेभारतमाता च्या रुपात असलेल्या मुली कडे सर्व जण लक्ष केंद्रित केले होतेव दोनशे फूट राष्ट्रीय ध्वज रॅली चे आकर्षक झाले होते भारतमाता की जय ,ये तिरंगा प्यारा, वनदे मातरम,मेरा करमा तू तेरा कर्मा मे,ऐ वतन प्यारे वतन,देशभक्ती गीते सादर करण्यात आलीयावेळी माजी उपसरपंच वहिद शेख, राजू लिंगे, रोहित शेळके, पठाण मॅडम, अश्विनी पेरकर, वैशाली शेळके, ललिता हजारी, विकास गोरे, भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

## डॉ. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत करीयर एकेडमी तर्फे तिरंगा रैली



**दौलताबाद (जावेद अहमद)** : १५ ऑगस्ट रोजी ७९ स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने भारत करीयर एकेडमी तर्फ तिरंगा रैली पडेगाव ते नगर नाका शहीद सैनिक स्मारका पर्यंत राज्यसभा सदस्य माजी राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थिती त काढण्यात आलीया रॅली मध्ये ७०० विद्यार्थी सहभागी झाले होतेभारतमाता च्या रुपात असलेल्या मुली कडे सर्व जण लक्ष केंद्रित केले होतेव दोनशे फूट राष्ट्रीय ध्वज रॅली चे आकर्षक झाले होते भारतमाता की जय ,ये तिरंगा प्यारा, वनदे मातरम,मेरा करमा तू तेरा कर्मा मे,ऐ वतन प्यारे वतन,देशभक्ती गीते सादर करण्यात आलीयावेळी भाजपचे दीपक बनकर,दीपक ढाकणे,शुभम मनगटे,कविता देशमुख संचालक बाळासाहेब घुगे,समाधान सुरडकर, अमोल कवडे,दीपक रोकडे,कैलास वाणी,नंदू शिंदे,धारकर व शिक्षक व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट
स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002